# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date – 06 February 2025

# Time 01.00 to 01.05 PM

# Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक ०६ फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.**

****

लोकसभेच्या कामकाजाला आज सकाळी सुरुवात होताच विरोधकांनी अमेरिकेहून हद्दपार केलेल्या भारतीय नागरिकांचा मुद्दा उपस्थित केला. या मुद्यावरुन सभागृहाचं कामकाज सुरुवातीला १२ वाजेपर्यंत कामकाज तहकूब करण्यात आलं. त्यानंतर परत कामकाजाला सुरुवात होताच अर्थसंकल्पावरील चर्चेला सुरुवात झाली. मात्र, विरोधकांनी याच मुद्यावर परत गोंधळ घातल्यानंतर लोकसभेचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेतही याच मुद्यावर गोंधळ झाला. उपसभापती हरिवंश यांनी सुरुवातीला १२ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं. त्यानंतर कामकाजाला सुरुवात झाल्यानंतर अमेरिकेहून परत आलेल्या भारतीयांच्या मुद्यावर परराष्ट्रमंत्री एस जयशंकर दुपारी दोन वाजता निवेदन देणार असल्याची माहिती राज्यसभा सभापती जगदीप धनकड यांनी दिली.

दरम्यान, राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर पंतप्रधान नरेंद्र मोदी आज राज्यसभेत चार वाजता उत्तर देणार आहेत. पंतप्रधान कार्यालयानं समाजमाध्यमावरील संदेशात ही माहिती दिली.

****

परीक्षा पे चर्चा कार्यक्रम १० फेब्रुवारी रोजी नवी दिल्ली इथं भारत मंडपमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमवेत विविध क्षेत्रातील तज्ज्ञ या कार्यक्रमात सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांचं निराकरण करतील. ३६ विद्यार्थी पंतप्रधानांसोबत थेट संवाद साधणार आहेत. यावर्षी विविध माध्यमांतून सहभागी विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांची विक्रमी संख्या पाच कोटी एवढी आहे.

****

दहावी आणि बारावीच्या राज्य मंडळाच्या परीक्षा येत्या ११ फेब्रुवारीपासून सुरु होत आहेत. परीक्षा काळात विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यासाठी राज्य मंडळस्तरावर समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती राज्य मंडळ सचिव डॉ. माधुरी सावरकर यांनी दिली. सकाळी ८ ते रात्री ८ या कालावधीत विद्यार्थ्यांना भ्रमणध्वनीद्वारे निःशुल्क आवश्यक ते समुपदेशन मिळणार असल्याचं सावरकर यांनी सांगितलं.

****

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज नांदेड दौऱ्यावर येत आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर मतदारांचे आणि लाडक्या बहिणींचे आभार मानण्यासाठी नांदेडमध्ये ते जाहीर सभा घेणार आहेत. नांदेड इथल्या श्री हुजूर साहेब सचखंड गुरुद्वाराला देखील शिंदे भेट देणार आहेत.

****

नांदेडचे जिल्हाधिकारी म्हणून राहुल कर्डिले यांनी आज पदभार स्वीकारला. नांदेडचे मावळते जिल्हाधिकारी अभिजीत राऊत छत्रपती संभाजीनगर इथं वस्तू आणि सेवा कर विभागाचे सहआयुक्त म्हणून पदभार स्वीकारणार आहेत.

****

पक्ष आणि सरकार यामधील समन्वय साधण्यासाठी ज्या ठिकाणी भारतीय जनता पक्षाचे पालकमंत्री नाहीत, त्या सतरा जिल्ह्यांमध्ये पक्षानं जिल्हा संपर्कमंत्री नियुक्त केले आहेत. यामध्ये अतुल सावे यांची छत्रपती संभाजीनगर, पंकजा मुंडे बीड, जयकुमार गोरे धाराशिव, मेघना बोर्डीकर यांची हिंगोली जिल्ह्याच्या संपर्क मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

****

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या, पनवेल-इंदापूर या ८४ किलोमीटर टप्प्याचं काम येत्या डिसेंबर पर्यंत पूर्ण होईल अशी माहिती राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं दिली आहे. सध्या पनवेल ते इंदापूर दरम्यानच्या टप्प्यात सेवा रस्ता पूर्ण करण्याचे काम प्रगतीपथावर असून, मुख्य रस्त्याच्या व्हाईट टॉपिंग-पीक्यूसीचं काम पूर्ण झाल्याची माहिती प्राधिकरणानं दिली आहे.

****

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या वतीनं काल वेव्हज परिषदेचं मुंबईतल्या राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ-एनएफडीसी मध्ये आयोजन करण्यात आलं होतं. या परिषदेसाठी मुंबईतल्या विविध महाविद्यालयातले विद्यार्थी सहभागी झाले होते.

ॲनिमेशन, व्हीएफएक्स या क्षेत्रात असलेल्या संधींचा युवा वर्गानं फायदा करून घ्यावा,असं या परिषदेच्या मार्गदर्शक सरस्वती वाणी यांनी म्हटलं.

****

प्रयागराज इथं आज महाकुंभात आदिवासी सांस्कृतिक समागम-२०२५ आयोजित करण्यात आला आहे. बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त २०२५ हे वर्ष आदिवासी अभिमानाचे वर्ष म्हणून घोषित करण्यात आलं आहे. दरम्यान आज सकाळी आठ वाजेपर्यंत सुमारे ३८ लाख ७० हजार भाविकांनी त्रिवेणी संगमावर स्नान केल्याची माहिती महाकुंभ मेळा प्रशासनानं दिली आहे.

दरम्यान, महाकुंभमेळ्यात भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याचे २३३ एटीएम उभारण्यात आले आहेत. या माध्यमातून आतापर्यंत ४० लाख ८५ हजार भाविकांना शुद्ध पाणी मिळाल्याचं प्रशासनातर्फे सांगण्यात आलं.

****

भारत आणि इंग्लंड दरम्यान तीन एकदिवसीय सामन्यांच्या क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्याला थोड्याच वेळात नागपूर इथं सुरुवात होणार आहे. भारतीय पुरुष संघानं ऑगस्टमध्ये श्रीलंकेविरुद्ध एकदिवसीय मालिका २-० अशी गमावली होती. त्यानंतर प्रथमच भारतीय संघ एकदिवसीय मालिकेसाठी मैदानात उतरत आहे. या मालिकेतला दुसरा सामना येत्या रविवारी कटकमध्ये तर शेवटचा सामना १२ फेब्रुवारीला अहमदाबादमध्ये होणार आहे.

****

ज्येष्ठ क्रीडा आणि चित्रपट समीक्षक, लेखक द्वारकानाथ संझगिरी यांचं आज प्रदीर्घ आजारानं निधन झालं. ते ७४ वर्षांचे होते. संझगिरी यांच्यावर मुंबईतल्या लीलावती रुग्णालयात उपचार सुरू होते. शिक्षणानं अभियंता असणारे संझगिरी हे मुंबई महापालिकेत मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते. क्रीडा आणि चित्रपट या विषयांवरील त्यांचं समीक्षण वाचकांच्या विशेष पसंतीला उतरलं. संझगिरी यांच्या पार्थिवावर उद्या दुपारी १२ वाजता दादर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

****